**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

(१)श्री. साथी बशीर अहमद बाशामियाँ शेख
(२)श्री.रमेश राजाराम सरगर
४१२, तुळजाभवानी नगर, अक्कलकोट
रोड,सुत मिलमागे, सोलापूर **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन
विभाग - १, जिल्हा परिषद, सोलापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य
प्रशासन विभाग -१, जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२८ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१०.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता :-** (१)श्री. साथी बशीर अहमद बाशामियाँ शेख<br>(२)श्री.रमेश राजाराम सरगर<br>४१२, तुळजाभवानी नगर, अक्कलकोट<br>रोड, सुत मिल मागे, सोलापूर<br>**अपिलीय प्राधिकारी तथा:-** कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन<br>विभाग -१, जिल्हा परिषद, सोलापूर श्री.विजय शं.मुळीक<br>**जन माहिती अधिकारी तथा :-** उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य<br>प्रशासन विभाग - १, जिल्हा परिषद, सोलापूर श्री.बी.एम.स्वामी | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१६.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.१.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.९.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२७.६.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** आरोग्य विभागातील लिपीक श्री.एस. एम.घोडके यांचे विरूध्द दि.२६.१२.२००६ रोजी केलेल्या तक्रार अर्जावर केलेली कार्यवाही,सदर तक्रारीवर चौकशी अधिकारी नेमले आहेत काय,असल्यास अधिकाऱ्याचे नाव ,हुद्दा,पत्रव्यवहार व टिप्पण्या. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १८.०६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २९.१०.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपण केलेल्या तकारींबाबत झालेल्या कार्यवाहीची माहिती न मिळाल्याच्या कारणावरून अपीलकर्ता श्री.साथी बशीरअहमद बाशामियाँ शेख व श्री.रमेश राजाराम सरगर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. श्री.शेख व श्री.सरगर यांना माहिती देण्यात आली, तसेच अभिलेखाचे निरीक्षणही करू देण्यात आले. मात्र आपल्या तक्रारी अर्जानुसार कार्यवाही व्हावी यासाठी श्री.शेख यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. त्यांनी केलेल्या तक्रारीबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी चौकशी करून तक्रार दप्तरी दाखल केली आहे. माहिती पूर्ण मिळाली असून काहीही तक्रार नाही, अपील निकाली काढण्यात यावे असे श्री.शेख यांनी लेखी दिले आहे, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.विजय शं.मुळीक यांनी सुनावणीच्या वेळी सादर केले. श्री.शेख यांनी आयोगालाही स्वतंत्र पत्राद्वारे तसे कळविले आहे.

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दिनांक ६१.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवाजी आनंदा कापसे
जुंना बुधवार पेठ, डांगे गल्ली, डी वॉर्ड, पाठीमागची बाजू,
घर नं.२६४६, कोल्हापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता, राजर्षी छत्रपती शाहू महाराज
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रूग्णालय, कोल्हापूर, जि.कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी(रूग्णालय),
राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
आणि रूग्णालय, कोल्हापूर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवाजी आनंदा कापसे
जुना बुधवार पेठ, डांगे गल्ली, डी वॉर्ड, पाठीमागची बाजू,
घर नं.२६४६, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता, राजर्षी छत्रपती शाहू महाराज
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रूग्णालय, कोल्हापूर, जि.कोल्हापूर डॉ.आर.एम.पोवार

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी(रूग्णालय),<br>राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय<br>आणि रूग्णालय, कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.अशोक आण्णा कांबळे | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.९.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.९.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br><br>माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२८.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्या मागणीनुसार संपूर्ण माहिती मिळावी, ती न देणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.शिवाजी आनंदा कापसे यांनी केली.

श्री.कापसे यांनी विशिष्ट प्रकारची कारवाई करता येईल का, अशा स्वरूपाचे प्रश्न विचारले होते. तसेच त्यांनी मागितलेली माहिती एकूण २३ विभागांशी संबंधित होती. माहिती संकलनासाठी विलंब झाला. व्यक्तिश: माहिती नेणार असल्याचे श्री.कापसे यांनी नमूद केले होते, परंतु ते माहिती नेण्यासाठी आले नाहीत. पत्रव्यवहारानेही त्यांनी संपर्क साधला नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी (रूग्णालय), राजर्षि छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रूग्णालय, कोल्हापूर श्री.अशोक आण्णा कांबळे व अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता, राजर्षि छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रूग्णालय, कोल्हापूर डॉ.आर.एम.पोवार यांनी केले. विलंब झाल्यामुळे माहिती नि:शुल्क देऊ केली

असता ती न घेता श्री.कापसे यांनी आयोगाकडे अपील केले, असेही त्यांनी नमूद केले. श्री.कापसे यांना शासकीय माहिती घेण्यामध्ये रूची नसून शासनाला त्रास देणे, शासकीय अधिकाऱ्यांना वेठीस धरणे व माहितीच्या अधिकाराचा गैरवापर करून शासकीय अधिकाऱ्यांना त्रास देण्याचे प्रयत्न करीत आहेत, असे अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता, राजर्षि छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रूग्णालय, कोल्हापूर डॉ.आर.एम.पोवार यांनी दि.२७.४.२००९ च्या लेखी निवेदनात म्हटले आहे.

अधिकारी व कर्मचारी वेळेत हजर राहत नाहीत, दिलेले काम वेळेत करीत नाहीत, अशा स्वरूपाच्या तक्रारी श्री.कापसे यांनी लेखी नोंदविल्या आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्यांचा समावेश होत नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे:

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२७.११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. पांडुरंग जोती अडसुळे
७१३-ए वॉर्ड, गंजीमाळ, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा आरोग्याधिकारी,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३३ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९.३.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. पांडुरंग जोती अडसुळे
७१३-ए वॉर्ड, गंजीमाळ, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा आरोग्याधिकारी,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.१०.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१.१०.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.११.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.११.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. १९.३.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

महापालिकेकडील कचरा उठावाचे काम करारातील अटींनुसार होत नसताना आपल्याला चुकीची माहिती दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. पांडुरंग जोती आडसुळे यांनी केली.

जन माहिती अधिकारी तथा आरोग्याधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांनी श्री. अडसुळे यांना मुद्देनिहाय योग्य माहिती दिली आहे, याची खात्री झाल्यामुळे अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांनी अपील फेटाळले. कचरा उठावाचे काम मे. रामकी इन्व्हायरो इंजिनिअर्स प्रा. लि., हैद्राबाद या संस्थेस दिलेले आहे. सदर कंपनीने याकामी केलेल्या करारानुसार काही प्रमाणात कराराप्रमाणे काम होत नसले कारणाने माहे मे २००८ पासून त्यांच्या दरमहाच्या झाले कामाच्या देयकातून दरमहा दंडाची शिफारस त्याच्या बिलाच्या रकमेवर करणेत येऊन व तेवढी दंडाची रक्कम थोपविण्यात आलेली आहे. माहे मे २००८ ते ऑगस्ट २००८ अखेर दंडाची रक्कम रू. ४,६६,०८९/-, तर आजअखेर म्हणजे सप्टेंबर व ऑक्टोबर २००८ अखेरचीच बिले अदा केली असून या २ महिन्यांच्या दंडाची रक्कम रु.२,८६,०१७/- इतकी आहे, असे जन माहिती अधिकारी तथा आरोग्याधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर डॉ.एस.एच.देशमुख व अपिलीय प्राधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. गणेश देशमुख यांनी लेखी व तोंडी नमूद केले. तसेच अपीलकर्त्यास मूळ अर्जाव्यतिरिक्त काही माहिती हवी असल्यास तीही देण्याची तयारी विहित मुदतीतच दर्शविली असल्याचे त्यांनी पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणले. हे लक्षात घेता अपीलकर्त्याची तक्रार रास्त नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. १२ .११.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. १९.३.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

महापालिकेकडील कचरा उठावाचे काम करारातील अटींनुसार होत नसताना आपल्याला चुकीची माहिती दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. पांडुरंग जोती आडसुळे यांनी केली.

जन माहिती अधिकारी तथा आरोग्याधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांनी श्री. अडसुळे यांना मुद्देनिहाय योग्य माहिती दिली आहे, याची खात्री झाल्यामुळे अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांनी अपील फेटाळले. कचरा उठावाचे काम मे. रामकी इन्व्हायरो इंजिनिअर्स प्रा. लि., हैद्राबाद या संस्थेस दिलेले आहे. सदर कंपनीने याकामी केलेल्या करारानुसार काही प्रमाणात कराराप्रमाणे काम होत नसले कारणाने माहे मे २००८ पासून त्यांच्या दरमहाच्या झाले कामाच्या देयकातून दरमहा दंडाची शिफारस त्याच्या बिलाच्या रकमेवर करणेत येऊन व तेवढी दंडाची रक्कम थोपविण्यात आलेली आहे. माहे मे २००८ ते ऑगस्ट २००८ अखेर दंडाची रक्कम रू. ४,६६,०८९/-, तर आजअखेर म्हणजे सप्टेंबर व ऑक्टोबर २००८ अखेरचीच बिले अदा केली असून या २ महिन्यांच्या दंडाची रक्कम रु.२,८६,०१७/- इतकी आहे, असे जन माहिती अधिकारी तथा आरोग्याधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर डॉ.एस.एच.देशमुख व अपिलीय प्राधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. गणेश देशमुख यांनी लेखी व तोंडी नमूद केले. तसेच अपीलकर्त्यास मूळ अर्जाव्यतिरिक्त काही माहिती हवी असल्यास तीही देण्याची तयारी विहित मुदतीतच दर्शविली असल्याचे त्यांनी पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणले. हे लक्षात घेता अपीलकर्त्याची तक्रार रास्त नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. १२ .११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.संतोष प्रभाकर कुरणे
७१४-ए वॉर्ड, गंजीमाळ, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शहर उपअभियंता,
विभागीय कार्यालय क्र.१, वरूणतीर्थवेश, गांधी मैदान, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३८ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संतोष प्रभाकर कुरणे
७१४-ए वॉर्ड, गंजीमाळ, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.गणेश एन.देशमुख

**जन माहिती अधिकारी** तथा शहर उपअभियंता,
विभागीय कार्यालय क्र.१, वरूणतीर्थवेश, गांधी मैदान, कोल्हापूर श्री.एम.एम.निर्मळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.९.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.११.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या अर्जाची (मूळ अर्ज) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

चॅनेलवर (मोठ्या गटारावर) केलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत मागितलेली माहिती मिळाली परंतु हे बांधकाम अतिक्रमण असून काढून घ्यावे, अशी मागणी अपीलकर्ता श्री.संतोष प्रभाकर कुरणे यांनी केली.

श्री.कुरणे यांनी मागितलेली माहिती त्यांना विहित मुदतीत देण्यात आली. अतिक्रमण पाडण्याची त्यांची मागणी हा प्रशासकीय कार्यवाहीचा भाग असून नियमानुसार चौकशी करून त्याबाबतची माहितीही श्री.कुरणे यांना दिलेली आहे, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.गणेश एन.देशमुख व जन माहिती अधिकारी तथा शहर उपअभियंता, विभागीय कार्यालय क्र.१, वरूणतीर्थवेश, गांधी मैदान, कोल्हापूर श्री.एम.एम.निर्मळे यांनी केले. श्री.कुरणे यांची अतिक्रमण काढण्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२७.०१.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.माणिक अनंता पाटील
बंदी सी / १११३४, येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस सहआयुक्त,
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर, पुणे — उत्तरवादी
**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपायुक्त,
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.११.२००८ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपायुक्त,
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर, पुणे.प्रतिनिधी श्री.पी.एस.परांजपे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.५.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.११.२००६ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२७.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकात एकमत न झाल्यामुळे अपिलांची सुनावणी दि.२६.११.२००८ रोजी घेण्यात आली.

येरवडा कारागृह बंदी श्री.माणिक अनंता पाटील यांनी आपल्याविरूध्दच्या पोलीस अहवालाची माहिती जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपायुक्त, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर, पुणे यांच्याकडून मागितली होती. श्री.पाटील जन्मठेपेची शिक्षा कारागृहात भोगत असल्यामुळे सुनावणीला उपस्थित नव्हते.

संबंधित दस्तऐवज कारागृह विभागाच्या उपयोगासाठी व विश्वासाश्रित संबंधाने निर्माण करण्यात आला असल्याने माहितीच्या कलम ८(१)(ई)(जी) अन्वये जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी नाकारली व ही माहिती देणे शक्य नाही, असे जन माहिती अधिकाऱ्यांचे प्रतिनिधी श्री.पी.एस.परांजपे यांनी प्रतिपादन केले.

अनुषंगिक कागदपत्रे कायदाविषयक प्रक्रियेचा भाग असून विश्वासाश्रित संबंधानुसार ती निर्माण केली असे ठरत नाही. तसेच खटल्याचा निकाल लागलेला असल्यामुळे अपीलकर्त्यास १५ दिवसात ही माहिती निःशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे यांच्यामार्फत माहिती पुरविण्यात आल्याचा अहवाल अपीलकर्त्याची पोहोच असलेल्या स्वाक्षरीसह

सहाय्यक पोलीस आयुक्त, मानवी संसाधन विभाग, मुख्यालय, पुणे शहर श्री.पी.एस.परांजपे यांनी दि.१५.११.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२६.११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. प्रसाद गणपतराव धर्माधिकारी
संस्थापक छ. ताराराणी विकास आघाडी, शिरोळ
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४१ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.२.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. प्रसाद गणपतराव धर्माधिकारी
संस्थापक, छ. ताराराणी विकास आघाडी, शिरोळ
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर श्री. दि. जी. मळेकर

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर श्री. संतोष गजानन शेलार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.१०.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.१०.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.१२.२००८ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने त्याच दिवशी सुनावणी घेण्यात आली.

उप अभियंता, तथा माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम, उपविभाग मुख्यालय जयसिंगपूर यांच्याकडे आपण दि.९.९.२००८ रोजीच्या अर्जान्वये माहिती मागितली. म्हणजे आपल्याला दि. ८.१०.२००८ अखेर माहिती मिळणे आवश्यक होते. परंतु उप अभियंता यांनी आपला अर्ज दि. १२.९.२००८ रोजी कार्यकारी अभियंता यांच्याकडे पाठविला व सर्व कागदपत्रे या कार्यालयाच्या कक्षेत असताना माहिती देण्याची जबाबदारी त्यांच्यावर ढकलून टाळाटाळ केली. अर्ज वर्ग करण्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये असलेल्या पाच दिवसांच्या मुदतीचा फायदा घेऊन जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविलेले शुल्क, दि. ११.१०.२००८ रोजीपर्यंत माहिती न मिळाल्यामुळे आपण भरले नाही व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. त्यांनी अपील फेटाळले. उप अभियंता हे तालुका स्तरावरील कार्यकारी अधिकाऱ्याचे पद आहे. माहिती त्यांच्याकडेच होती, तरीही त्यांनी दिली नाही. याबद्दल त्यांना शास्ती व्हावी. तसेच ज्या विकास कामाची माहिती मागितली आहे, त्यात शासनाच्या पैशाचा अपहार झाला असून या कामाची आमच्या शिष्टमंडळासोबत पाहणी करुन चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी अपीलकर्ता श्री. प्रसाद गणपतराव धर्माधिकारी यांनी केली.

उप अभियंता हे त्यावेळी जन माहिती अधिकारी नव्हते. उपअभियंता हे अपिलीय प्रधिकारी व सहाय्यक उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग हे जन माहिती अधिकारी अशी त्यावेळची व्यवस्था होती. त्यानुसार श्री. धर्माधिकारी यांचा दि.९.९.२००८ चा अर्ज दि. १२.९.२००८ रोजी कार्यकारी अभियंता यांच्याकडे वर्ग केला. त्यांनी दि. ८.१०.२००८ च्या पत्रान्वये (वर्ग केलेला अर्ज प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत ) श्री. धर्माधिकारी यांना शुल्क कळविले. त्यांनी ते भरले

नाही. त्यामुळे माहिती तयार असूनही दिली नाही. त्यांनी शुल्क भरल्यास आजही देता येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर श्री. संतोष गजानन शेलार यांनी केले.

जन माहिती अधिकारी यांचे निवेदन लक्षात घेता त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. केवळ तांत्रिक स्वरुपाचे मुद्दे उपस्थित करुन, शुल्क न भरता अपील करण्याची श्री. धर्माधिकारी यांची कृती योग्य नाही. तसेच त्यांच्या शिष्टमंडळासोबत कामाची पाहणी करुन अहवाल सादर करावा, अशी मागणी माहितीच्या अधिकारात समाविष्ट होत नाही. भाष्य, मतप्रदर्शन, स्पष्टीकरण अशा स्वरुपाची मागणीही 'माहिती' म्हणून करता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

दि. १२.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रंशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. प्रसाद गणपतराव धर्माधिकारी
संस्थापक छ. ताराराणी विकास आघाडी, शिरोळ
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४१ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.२.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. प्रसाद गणपतराव धर्माधिकारी
संस्थापक, छ. ताराराणी विकास आघाडी, शिरोळ
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर श्री. दि. जी. मळेकर

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर श्री. संतोष गजानन शेलार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.१०.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.१०.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.१२.२००८ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने त्याच दिवशी सुनावणी घेण्यात आली.

उप अभियंता, तथा माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम, उपविभाग मुख्यालय जयसिंगपूर यांच्याकडे आपण दि.९.९.२००८ रोजीच्या अर्जान्वये माहिती मागितली. म्हणजे आपल्याला दि. ८.१०.२००८ अखेर माहिती मिळणे आवश्यक होते. परंतु उप अभियंता यांनी आपला अर्ज दि. १२.९.२००८ रोजी कार्यकारी अभियंता यांच्याकडे पाठविला व सर्व कागदपत्रे या कार्यालयाच्या कक्षेत असताना माहिती देण्याची जबाबदारी त्यांच्यावर ढकलून टाळाटाळ केली. अर्ज वर्ग करण्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये असलेल्या पाच दिवसांच्या मुदतीचा फायदा घेऊन जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविलेले शुल्क, दि. ११.१०.२००८ रोजीपर्यंत माहिती न मिळाल्यामुळे आपण भरले नाही व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. त्यांनी अपील फेटाळले. उप अभियंता हे तालुका स्तरावरील कार्यकारी अधिकाऱ्याचे पद आहे. माहिती त्यांच्याकडेच होती, तरीही त्यांनी दिली नाही. याबद्दल त्यांना शास्ती व्हावी. तसेच ज्या विकास कामाची माहिती मागितली आहे, त्यात शासनाच्या पैशाचा अपहार झाला असून या कामाची आमच्या शिष्टमंडळासोबत पाहणी करुन चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी अपीलकर्ता श्री. प्रसाद गणपतराव धर्माधिकारी यांनी केली.

उप अभियंता हे त्यावेळी जन माहिती अधिकारी नव्हते. उपअभियंता हे अपिलीय प्रधिकारी व सहाय्यक उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग हे जन माहिती अधिकारी अशी त्यावेळची व्यवस्था होती. त्यानुसार श्री. धर्माधिकारी यांचा दि.९.९.२००८ चा अर्ज दि. १२.९.२००८ रोजी कार्यकारी अभियंता यांच्याकडे वर्ग केला. त्यांनी दि. ८.१०.२००८ च्या पत्रान्वये (वर्ग केलेला अर्ज प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत ) श्री. धर्माधिकारी यांना शुल्क कळविले. त्यांनी ते भरले

नाही. त्यामुळे माहिती तयार असूनही दिली नाही. त्यांनी शुल्क भरल्यास आजही देता येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर श्री. संतोष गजानन शेलार यांनी केले.

जन माहिती अधिकारी यांचे निवेदन लक्षात घेता त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. केवळ तांत्रिक स्वरुपाचे मुद्दे उपस्थित करुन, शुल्क न भरता अपील करण्याची श्री. धर्माधिकारी यांची कृती योग्य नाही. तसेच त्यांच्या शिष्टमंडळासोबत कामाची पाहणी करुन अहवाल सादर करावा, अशी मागणी माहितीच्या अधिकारात समाविष्ट होत नाही. भाष्य, मतप्रदर्शन, स्पष्टीकरण अशा स्वरुपाची मागणीही 'माहिती' म्हणून करता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

दि. १२.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानाभवनसमोर, पुणे १

श्री. रमेश देवराम टाकळकर
मु.पो.पिंपळे जगताप, ता.शिरूर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप निबंधक ,
सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे-४ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक सचिव,
पुणे जिल्हा कृषि उत्पन्न बाजार समिती, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप निबंधक ,
सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे-४ श्री. एम.एस.जाधवर

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक सचिव,
पुणे जिल्हा कृषि उत्पन्न बाजार समिती, पुणे श्री. रविंद्र सुबराव साळुंखे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.६.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१.८.२००६ |

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २७.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २६.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री. रमेश देवराम टाकळकर, जन माहिती अधिकारी श्री. रविंद्र सुबराव साळुंखे व अपिलीय प्राधिकारी श्री. एम.एस. जाधवर यांची या कार्यक्रमाच्या वेळी चर्चा होऊन माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ नुसार संबंधित माहिती एक आठवड्यात प्रसिध्द करण्याचे ठरले. त्यानुसार माहिती प्रसिध्द करण्यात आली असून बाजार समितीच्या सूचना फलकावरही जाहीर करण्यात आली आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, श्री. रविंद्र सुबराव साळुंखे व अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे श्री. एम.एस. जाधवर यांनी केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३०.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुशांत सुभाष मोरे
४, केशर कॉम्प्लेक्स, ३४ पंतांचा गोट, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष,
सातारा मराठा विद्या प्रसारक समाज, सातारा, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
सातारा मराठा विद्या प्रसारक समाज, सातारा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४४ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष,
सातारा मराठा विद्या प्रसारक समाज, सातारा, जि.सातारा श्री.शरद शंकरराव चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
सातारा मराठा विद्या प्रसारक समाज, सातारा, जि.सातारा श्री.रामचंद्र कृष्णराव जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.१०.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. — |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. — |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकरी गैरहजर राहिल्यामुळे दि.१८.३.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ आपल्याला लागू नसल्याचे कारण देऊन सातारा मराठा विद्याप्रसारक समाज या न्यासाच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती नाकारली. सहाय्यक धर्मादाय आयुक्तांनी त्यांच्या कार्यालयात असलेल्या दस्तऐवजांच्या प्रती दिल्या, असे अपीलकर्ता श्री.सुशांत सुभाष मोरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात नमूद केले आहे.

श्री.मोरे यांनी मागितलेली माहिती नाकारलेली नव्हती. त्यांच्या अर्जातील काही मुद्दयांचा तपशील दिल्यास माहिती देणे संस्थेला सोयीचे होईल, असे त्यांना कळविले होते, जन माहिती अधिकारी तथा सचिव, सातारा मराठा विद्या प्रसारक समाज, सातारा श्री.रामचंद्र कृष्णराव जाधव व अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, सातारा मराठा विद्या प्रसारक समाज, सातारा श्री.शरद शंकरराव चव्हाण यांनी संबंधित पत्राच्या प्रतीसह नमूद केले. सन १९९० पासूनची माहिती श्री.मोरे यानी मागितली असून ती विस्तृत आहे. मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त मागणी अपिलामध्ये केली आहे, असे जन माहिती अधिकारी श्री.रामचंद्र कृष्णराव जाधव व अपिलीय प्राधिकारी श्री.शरद शंकरराव चव्हाण यांनी लेखी व तोंडी नमूद केले. त्यांचे निवेदन मान्य करण्यात येत आहे. मात्र अपीलकर्त्यास माहिती आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करून योग्य ते शुल्क भरून आवश्यक प्रती प्राप्त करून घेता येतील. त्यानुसार संस्थेने कार्यवाही करावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.३०.११.२००९

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुशांत सुभाष मोरे
४, केशर कॉम्प्लेक्स, ३४ पंतांचा गोट, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष,
सातारा मराठा विद्या प्रसारक समाज, सातारा, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
सातारा मराठा विद्या प्रसारक समाज, सातारा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४४ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष,
सातारा मराठा विद्या प्रसारक समाज, सातारा, जि.सातारा श्री.शरद शंकरराव चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
सातारा मराठा विद्या प्रसारक समाज, सातारा, जि.सातारा श्री.रामचंद्र कृष्णराव जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.१०.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. — |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. — |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी गैरहजर राहिल्यामुळे दि.१८.३.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ आपल्याला लागू नसल्याचे कारण देऊन सातारा मराठा विद्याप्रसारक समाज या न्यासाच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती नाकारली. सहाय्यक धर्मादाय आयुक्तांनी त्यांच्या कार्यालयात असलेल्या दस्तऐवजांच्या प्रती दिल्या, असे अपीलकर्ता श्री.सुशांत सुभाष मोरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात नमूद केले आहे.

श्री.मोरे यांनी मागितलेली माहिती नाकारलेली नव्हती. त्यांच्या अर्जातील काही मुद्दयांचा तपशील दिल्यास माहिती देणे संस्थेला सोयीचे होईल, असे त्यांना कळविले होते, जन माहिती अधिकारी तथा सचिव, सातारा मराठा विद्या प्रसारक समाज, सातारा श्री.रामचंद्र कृष्णराव जाधव व अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, सातारा मराठा विद्या प्रसारक समाज, सातारा श्री.शरद शंकरराव चव्हाण यांनी संबंधित पत्राच्या प्रतीसह नमूद केले. सन १९९० पासूनची माहिती श्री.मोरे यानी मागितली असून ती विस्तृत आहे. मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त मागणी अपिलामध्ये केली आहे, असे जन माहिती अधिकारी श्री.रामचंद्र कृष्णराव जाधव व अपिलीय प्राधिकारी श्री.शरद शंकरराव चव्हाण यांनी लेखी व तोंडी नमूद केले. त्यांचे निवेदन मान्य करण्यात येत आहे. मात्र अपीलकर्त्यास माहिती आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करून योग्य ते शुल्क भरून आवश्यक प्रती प्राप्त करून घेता येतील. त्यानुसार संस्थेने कार्यवाही करावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. जगन्नाथ दादा जानकर **अपीलकर्ता**
मु.पळसावडे, पो.देवापूर, ता.माण, जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप विभागीय कृषि अधिकारी,
कृषि विभाग फलटण, ता.फलटण, जि.सातारा **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** तालुका कृषि अधिकारी,
दहिवडी, ता.माण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४५४ / २००९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०.११.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. जगन्नाथ दादा जानकर<br>मु.पळसावडे, पो.देवापूर, ता.माण, जि.सातारा |
| | **अपिलीय प्राधिकारी तथा** | उप विभागीय कृषि अधिकारी,<br>कृषि विभाग फलटण, ता.फलटण, जि.सातारा |
| | **जन माहिती अधिकारी तथा** | तालुका कृषि अधिकारी,<br>दहिवडी, ता.माण, जि.सातारा |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.३.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.३.२००९ |
| ८ | माहिती-मागणीचा मूळ अर्ज (जोडपत्र 'अ') ची प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, दहिवडी, ता.माण यांनी माहितीसाठी १६००/- रुपये शुल्क कळविले. विहित मुदतीत ते कळविले नसल्यामुळे माहिती नि:शुल्क मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. जगन्नाथ दादा जानकर यांनी केली होती. अपिलीय प्राधिकारी तथा उप विभागीय कृषि अधिकारी, फलटण यांनी ती मान्य केली होती. तरीही माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री. जानकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. मात्र दरम्यानच्या काळामध्ये जन माहिती अधिकाऱ्यांकडून विनाशुल्क माहिती मिळाली असल्यामुळे अपील निकाली काढावे, अशा विनंतीचे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री. जानकर यांनी दि.१९.११.२००९ रोजी आयोगाला पाठविले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३० .११.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.कमलाकर दत्ताजीराव धनवडे
११३२, ई वॉर्ड, साईक्स एक्सटेंशन, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.कमलाकर दत्ताजीराव धनवडे
११३२, ई वॉर्ड, साईक्स एक्सटेंशन, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.गणेश एन.देशमुख

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर विद्यमान श्री.महादेव मारूती निर्मळे
तत्कालीन-श्री.एन.एस.सरनोबत

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.४.१०.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र क) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२८.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सन १९८० पूर्वी केलेल्या बांधकामाच्या संदर्भातील माहिती वारंवार मागूनही आपल्याला दिली जात नाही. आपण जुन्या इमारतीची माहिती मागितली. परंतु नवीन बांधकामाबाबतची व तीही चुकीची माहिती दिली जात आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.कमलाकर दत्ताजीराव धनवडे यांनी केले.

श्री.धनवडे सातत्याने हा विषय मांडत असून न्यायालयासह विविध पातळ्यांवर अर्ज, पत्रव्यवहार व तक्रारी करीत आले आहेत. आपल्या मालकीची जमीन काढून घेऊन ती माजी नगराध्यक्षांना दिली, असा त्यांचा मुद्दा असून दावा न्यायालयात प्रलंबित आहे. यापूर्वी आयोगाकडील अपील क्र.३७३ व ४४४ मध्ये आयोगाने दिलेल्या निदेशानुसार दि.१२.१.२००९ रोजी श्री.धनवडे यांच्या विविध विभागीय कार्यालयांकडील माहिती-मागणीच्या सर्व अर्जांसंदर्भात सर्व संबंधित विभागांची त्यांच्या समवेत एकत्रित बैठक घेतली व त्यांच्या सर्व प्रश्नांची चर्चा करून उत्तर दिले. त्यांनी मागितलेली कागदपत्रे क वर्गातील असून जतनाची मुदत पाच वर्षे इतकी आहे. त्यामुळे सन १९८०-८१ या कालावधीतील कागदपत्रे उपलब्ध नाहीत, असे त्यांना त्याही वेळी स्पष्ट करण्यात आले, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.गणेश एन.देशमुख यांनी केले.

अपीलकर्ता श्री. धनवडे यांची मूळ तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येणारा विषय नाही. परंतु माहिती देण्याबरोबरच संबंधित सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांची एकत्रित चर्चा करण्याची आयोगाने आदेशित केलेली कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांनी पूर्ण केलेली आहे, हे लक्षात घेता श्री.धनवडे यांनी पुनः पुन्हा त्याच मागणीसाठी त्याच स्वरूपाचे अर्ज करणे योग्य नाही, याची समज त्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.३०.११.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरगोंडा बाळगोंडा पाटील
सुकल्प, कांडगे मळा, जैन मंदिर, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद कोल्हापूर, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, सरसवती हायस्कूल,
टाकळीवाडी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५१ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.४.२००९ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.सुरगोंडा बाळगोंडा पाटील<br>सुकल्प, कांडगे मळा, जैन मंदिर, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद कोल्हापूर, कोल्हापूर श्री.एस.एस.गोसावी<br>**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, सरसवती हायस्कूल,<br>टाकळीवाडी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर<br>विद्यमान-श्री.पी.ए.देसाई, तत्कालीन-श्री.पी.बी.नाईक | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.१०.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.१०.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.११.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२८.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सन १९८२ ते २००४ या कालावधीतील आपले गोपनीय अहवाल चांगले आहेत. त्यानंतर संस्था चालकांच्या नातलगांना नियमबाह्य बढती देण्यात आली व त्यासाठी आपले गोपनीय अहवालात विरुध्द नोंदी केल्या गेल्या. संपूर्ण माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कोल्हापूर, कोल्हापूर यांनी देऊनही उशिरा माहिती दिली गेली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सुरगोंडा बाळगोंडा पाटील यांनी केली. गोपनीय अहवालाच्या प्रती देण्यात आल्या. तसेच गोपनीय अहवालातील नोंदीबाबतची कारणेही विहित मुदतीत श्री.पाटील यांना कळविण्यात आली, असे निवेदन तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.पी.ए.देसाई व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.पी.बी.नाईक यांनी केले, ते रास्त असल्याचे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कोल्हापूर, कोल्हापूर यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली. बेकायदेशीररित्या बढत्या दिल्याबाबतची तक्रार, निलंबन व बडतर्फीच्या कारवाईची वैधता आदी बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.२३.११.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. सुरगोंडा बाळगोंडा पाटील
सुकल्प, काडगे मळा, जैन मंदिर,
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद कोल्हापूर, जि.कोल्हापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद कोल्हापूर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५२ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.०७.०२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. सुरगोंडा बाळगोंडा पाटील
सुकल्प, काडगे मळा, जैन मंदिर,
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद कोल्हापू, जि.कोल्हापूर श्रीमती जयश्री भोज

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.एस.एस.गोसावी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०१.०९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१०.११.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.११.१०.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२६.१२.२००८ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.०७.०२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

आपण माहिती मागितलेल्या ४ पैकी मुद्दा क्र. १ व २ ची माहिती समाधानकारक दिली ३ व ४ ची दिली नाही. माहिती देण्यास झालेल्या विलंबाबात नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.सुरगोंडा बाळगोंडा पाटील यांनी केली.

श्री.पाटील यांनी मागितलेली माहिती संस्थेच्या स्तरावरील असल्यामुळे व शाळेचे मुख्याध्यापक हे जन माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांच्याकडून माहिती घेण्याबाबत श्री.पाटील यांना कळविले होते. परंतु मुख्याध्यापक यांनी माहिती न दिल्यामुळे श्री.पाटील यांनी अपिलीय प्राधिकानी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. अपिलातील निर्णयानुसार कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती देण्यात आली. त्याच दिवशी शाळेकडून प्राप्त झालेली माहिती त्यांना टपालाने पाठविली. मुद्दा क्र.३ मध्ये त्यांनी खुलाशाची मागणी केली होती. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये खुलासा मागता येत नाही. त्यामुळे त्यावर भाष्य केले नाही. मुद्दा क्र.४ बाबत अभिप्राय विचारला होता. त्याविषयी सुधारित पत्र देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी सांगितले त्यानुसार दि.०९.०२.२००९ रोजी स्पष्टीकरणात्मक पत्र शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्री.एस.एस.गोसावी यांनी श्री.पाटील यांना पाठविले. तसे त्यांनी या पत्राच्या प्रतीसह आयोगास अवगत केले, त्याचे प्रतिपादन मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

पुणे
दि. : २८-११-२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री.साहेबराव रामराव काशीद
मु. पो. रातंजन, ता. बार्शी जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, सोलापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा आस्थापना अव्वल कारकून,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५५ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१०.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता :-** श्री.साहेबराव रामराव काशीद<br>रातंजन, ता. बार्शी जि. सोलापूर<br><br>**जन माहिती अधिकारी तथा :-** आस्थापना अव्वल कारकून,<br>उपविभागीय अधिकारी कार्यालय, सोलापूर श्री.एस.एम.बिराजदार | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.४.०६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ---- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख . | दि. २६.०९.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br><br>तहसील कार्यालय, बार्शी यांच्या दि.४.७.२००२ च्या निकाला प्रमाणे व दि.३.४.२००६च्या पत्रावर काय कार्यवाही केली, दि.४.७.२००२ च्या तहसील,बार्शी यांच्या निकालावर अपील कधी दाखल केले,अपील दाखल करण्याची मुदत किती,अपील मुजूर झाले किंवा नाही,मंजूर झाले असल्यास चौकशी कधी होणार व इतर एकूण ९ मुद्यांची माहिती. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १९.०६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २९.१०.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

पाझर तलावाच्या पाणलोट क्षेत्रात केलेल्या रस्त्यावरील अतिक्रमण हटवून मिळण्याबाबत शेतकरी सन १९७८-७९ पासून सातत्याने मागणी करीत असून आजपर्यंत रस्ता झालेला नाही. त्याबाबतची माहिती दिली जात नाही व कार्यवाही केली जात नाही. रस्ता नसल्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या जमिनीकडे जाणे कठीण होते. पाझर तलाव जिल्हा परिषदेच्या ताब्यात असून शेतकऱ्यांना असलेला रस्ता पाणलोट क्षेत्रात गेला आहे. रस्ता देण्याचा आदेश तहसीलदारांना दिलेला असतानाही अजून रस्ता झालेला नाही, तो व्हावा, अशी मागणी अपीलकर्ता श्री.साहेबराव रामराव काशीद यांनी केली.

पर्यायी रस्ता करून देण्याबाबत जिल्हा परिषदेला कळविण्यात आले आहे. परंतु पुढील कार्यवाही झालेली नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी कार्यालय, सोलापूर श्री.एस.एम.बिराजदार यांनी केले.

श्री.काशीद यांनी केलेली मागणी मुख्यतः प्रशासकीय कार्यवाहीची असली तरी शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या विषयाबाबतच्या कार्यवाहीची माहिती ते मागत आहेत. जवळजवळ तीस वर्षे होऊन गेली तरी या मागणीबाबत काय परिस्थिती आहे, हे नागरिकांना-शेतकऱ्यांना कळविले जात नाही, रसता देण्याचया आदेशाची अंमलबजावणी होत नाही व ती न होण्याचे कारणही हाप्रश्न ज्याच्या चरितार्थाशी निगिउत आहे, त्यांना कळत नाही, ही शासकीय कारभारातील पारदर्शकता नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत शासकीय कारभारात पारदर्शकता असणे व शासनाच्या निर्णयाबाबत, योजनांबाबत व नागरिकांच्या मागण्यांवरील कार्यवाहीबाबत शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती नागरिकांना तत्परतेने देणे आवश्यक आहे. या अधिनियमाच्या कलम ४ नुसार ते बंधनकारक आहे.

रातंजन येथील संबंधित शेतकऱ्यांना रस्ता उपलब्ध करून देण्याबाबत जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीच्या सद्यस्थितीसह संपूर्ण माहिती देणारा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी दि.३०.११.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्ता यांना देण्यात यावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) आयोगाने सुनावणीच्या वेळी दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी आयोगाला ३०.१२.२००९ पर्यंत सादर करावा.

पुणे
दिनांक३०.११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

प्रत:: मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांना योग्य त्या कारवाईसाठी.